महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक २१ ऑगस्ट २०१४

# मा.सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत

सभा क्रमांक १६ दिनांक २१.८.२०१४
सभा सूचना क्रमांक ५ दिनांक ११.८.२०१४
सभा क्रमांक ३ दिनांक २१.८.२०१४

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारणा सभा गुरुवार दिनांक २१.८.२०१४ ( दिनांक २०.८.२०१४ रोजींची तहकूब सर्वसाधारण सभा ) रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ५ दिनांक ११.८.२०१४ रोजींच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.
सभेस हजर सदस्य खालील प्रमाणे .. ..

**१. श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील- मा.महापौर**
**२. श्री.मुकेश मधुकर मोकाशी- उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | आरज प्रगती भारत | ४. | नरेश रतन मणेरा |
| ५. | डुंबरे मनोहर जयसिंग | ६. | उज्ज्वला रामचंद्र फडतरे |
| ७. | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | ८. | स्नेहा अंकुश पाटील |
| ९. | मधुकर रामचंद्र पावशे | १०. | उषा संजय भोईर |
| ११. | भोईर संजय देवराम | १२. | आशादेवी शेरबहादूर सिंह |
| १३. | वाव्हळ सुभाष सिताराम | १४. | इंदिसे रेखाबाई दिनानाथ |
| १५. | संभाजी धोंडीराम तांडेल | १६. | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| १७. | विलास चंदू कांबळे | १८. | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| १९. | राधा फत्तेबहादूर सिंग | २०. | राजकुमार रामनयन यादव |
| २१. | चिंदरकर कांचन विजय | २२. | सरैया अमित जयसिंग |
| २३. | जाधवर राधाबाई सुभाष | २४. | जगदाळे हनुमंत ज्ञानू |
| २५. | वर्षा वसंत पाटील | २६. | भोईर विमल अर्जुन |
| २७. | चव्हाण विक्रांत भिमसेन | २८. | पाटील कल्पना हरिश्चंद्र |
| २९. | पांन्डे संजय श्रीनाथ | ३०. | पाटील शारदा विजय |
| ३१. | साप्ते राजेंद्र रमेश | ३२. | लासे विजया मनोज |
| ३३. | गौरी अनिता सुनिल | ३४. | पाटील उमेश काशिनाथ |
| ३५. | देसाई सुहास सुर्यकांत | ३६. | महेश्वरी संजय तरे |
| ३७. | नंदा कृष्णा पाटील | ३८. | नंदिनी राजन विचारे |
| ३९. | वडवले संतोष वसंत | ४०. | कणसे निर्मला शरद |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१. | वैती अशोक बारकू | ४२. | बोरिटकर प्रभा अशोक |
| ४३. | भोईर एकता एकनाथ | ४४. | आशा बाबासाहेब कांबळे |
| ४५. | जितेंद्र प्रभाकर वाघ | ४६. | शान मनप्रित गुरमकसिंग |
| ४७. | शिंदे मनोज तुकाराम | ४८. | काशिराम गोविंद राऊत |
| ४९. | घाडीगांवकर संजय पांडूरंग | ५०. | मोरे संध्या सुनिल |
| ५१. | खताळ विशाखा मधुकर | ५२. | जानकर योगेश तातोबा |
| ५३. | मोरे संजय भाऊराव | ५४. | वेतकर दिपक विजय |
| ५५. | संख्ये मिनल मुकूंद | ५६. | भोसले नम्रता दिपक |
| ५७. | नरेश गणपत म्हस्के | ५८. | हिरांकांत बेंडू फर्डे |
| ५९. | पाटील सुजाता भास्कर | ६०. | नारायण शंकर पवार |
| ६१. | सोनार सारिका संजय | ६२. | कोकाटे सुधीर विष्णू |
| ६३. | महेश सुरेश वाघ | ६४. | वाघ पुजा गणेश |
| ६५. | नजीब सुलेमान मुल्ला | ६६. | वहिदा मुस्तफा खान |
| ६७. | साळवे अपर्णा मिलिंद | ६८ | मनिषा महेश साळवी |
| ६९. | पाटील मनाली मिलिंद | ७०. | पाटील मिलिंद भारत |
| ७१. | केणी प्रमिला मुकूंद | ७२. | केणी मुकूंद बाळू |
| ७३. | मेघना सुनिल हांडोरे | ७४. | महदिप भुपेंद्रसिंह बिष्ट |
| ७५. | लोखंडे सुहासिनी सुनिल | ७६. | संजय संतू वाघुले |
| ७७. | पाटील मालती रमाकांत | ७८. | रेखा भालचंद्र पाटील |
| ७९. | राजे गिरीश अनंत | ८०. | ठाकूर अक्षय अनंत |
| ८१. | यादव रिटा राजनाथ | ८२. | कळंबे मंगल चंद्रकांत |
| ८३. | काकडे बालाजी दगडू | ८४. | कुरेशी यासीन अयुब |
| ८५. | गोटे सिंधु कुंदन | ८६. | भगत सुधीर रामचंद्र |
| ८७. | किणे राजन नारायण | ८८. | पाटील रेखा रमेश |
| ८९. | मिरजा जमेला तबस्सुम इनायत बेग | ९०. | पठाण अशरफ उस्मान |
| ९१. | अफिजा नसीरुद्दीन नाईक | ९२. | आशरिन इब्राहिम राऊत |
| ९३. | खान मिराज नईम | ९४. | शेख रजिया इक्बाल |
| ९५. | पाटील शैलेश मनोहर | | |

## सभेस अनुपस्थित सदस्य खालीलप्रमाणे

१. मढवी बिंदू महेंद्र
२. पुर्णेकर जगन्नाथ यशवंत
३. चव्हाण तेजस्विनी किरण
४. चव्हाण सुधाकर वामन
५. पालांडे दशरथ बाबुराव
६. सरनाईक परिषा प्रताप
७. सरनाईक विहंग प्रताप
८. डिसोझा लॉरेन्स साल्वाडोर
९. पाटील रत्नप्रभा लक्ष्मण
१० मिलिंद माधव पाटणकर
११. एगडे रामचंद्र हरी
१२. मंदार प्रमोद विचारे
१३. तायडे रामभाऊ महादेव
१४. संगिता माणिक पाटील
१५. जगताप अश्विनी अशोक
१६. मोरे रुचिता राजेश
१७. साळवी मनोहर रामा
१८. महेश जगन्नाथ साळवी
१९. सामंत विलास शिवराम
२०. अनिता अरुण बिर्जे
२१. भरत अभिमन्यु चव्हाण
२२. टिकमाणी लक्ष्मण लच्छू
२३. नाईक राजश्री सुनिल
२४. राजेंद्र भालचंद्र गवारी
२५. पाटील अवंतिका शशिकांत
२६. कुरेश साजीया आई
२७. आलिया यासिन कुरेशी
२८. विश्वनाथ भगत
२९. डोंगरे सिराज महंमद अली
३०. अन्सारी साजिया परवीन सरफराज
३१. हिरा सिताराम पाटील

मा.महापौर सो.,छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात . तद्नंतर सभेस सुरुवात होते.

**मा.सचिव सो., सभेचे परिपत्रक वाचून दाखवितात.**

**श्री.सुहास देसाई :**

मा.महापौर सो., विषयपत्रिकेला सुरुवात करण्यापूर्वी काल ज्या विषयावर सभा तहकूब झाली होती त्यावर चर्चा सुरु करण्यांत यावी.

**मा.महापौर :**

विषयपत्रिका पूर्ण झाल्यावर या प्रकरणावरील चर्चा घेण्यांत यावी.

**श्री.सुहास देसाई :**

मा.महापौर महोदय, काल आपली त्या विषयावर सभा तहकूब झाली होती. सगळे सदस्य त्या विषयावर बोलले आहेत. सभागृहाच्या कामकाजाचे चार तास वाया गेलेले आहेत. काल जेव्हा आम्ही सांगत होतो की प्रकरणे आधी घ्या आणि नंतर हया विषयावर चर्चा करा त्यावेळी तुम्ही कोणी ऐकले नाहीत. मग आज असा काय विषय एका रात्रीत झाला की आधी प्रकरणे घेऊ आणि मग तो विषय नंतर घेऊ.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, माझी विनंती आहे की, या सभागृहात आपण जो विषय घेतला होता, दोन मिनिटांचा विषय होता. कायदेशीररित्या सर्वपरींनी आपली चर्चा काल झालेली आहे. आपल्याला तेव्हा सांगण्यांत आले होते की, आता आयुक्त सो., नाहीत आयुक्त सो., आल्यावर या विषयावर आपण चर्चा घेऊ. काल आपली चर्चा झालेली आहे. मला वाटते की, त्याची पार्श्वभूमी अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितली असेल. तर मला असे वाटते की, याबाबत प्रशासनाचा जो काही निर्णय आहे तो आयुक्त सो., यांनी या ठिकाणी सांगावा आणि विषयपत्रिकेला सुरुवात करावी. दोन मिनिटात तो विषय आधी संपवा. तो विषय जर दोन मिनिटात संपवायचा आहे तर विषयपत्रिकेची घाई कशाकरिता ? माझी आपल्याला विनंती आहे की, काल सभागृहात चर्चा झालेली आहे. मा.सभागृह नेते आणि मा.विरोधी पक्ष नेते देखिल उपस्थित होते.

**मा.महापौर :**

चर्चा करु नका असे म्हणत नाही परंतू प्रथम विषयपत्रिका पूर्ण करावी.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, या विषयावर पाच मिनिटात चर्चा पूर्ण होईल. विषयपत्रिका आपण पूर्ण करुच पण या विषयाला आपल्याला केवळ पाच मिनिटे लागणार आहेत.

**मा.महापौर :**

मा.आयुक्तांना या प्रकरणाची पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, काल सभागृहात आयुक्तांचे स्थानी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.शामशुंदर पाटील सो., उपस्थित होते त्यांनी आयुक्त सो., यांना सर्व इत्यंभूत माहिती दिलेली असेलच.

**मा.आयुक्त :**

सन्मा.महापौर , [illegible]. कालची सर्वसाधारण सभा ज्या विषयावर तहकूब झाली, त्याबाबत माझ्या ऑफिसने मला थोडेस ब्रीफ केलेले आहे. काल मी मंत्रालयात गेलेलो असल्याकारणाने मी इथे नव्हतो. तर त्याबाबत मी माझ्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे की, काल सभागृहात जी चर्चा झाली त्याबाबत वेगवेगळे विषय, ज्या काही स्पेसिफिक कंप्लेंटस् आणि जे काही एक्झॅक्ट इश्यूज त्यांनी या ठिकाणी रेझ केलेले आहेत ते लिस्टींग करुन घ्या. आणि यापूर्वीच्या ज्या तक्रारींच्या स्वरुपात श्री.रणखांब -उपआयुक्त हयांचा अहवाल आलेला होता त्या संदर्भात मी सौ.अंडे-सहाय्यक आयुक्तांना एक नोटीस दिलेली आहे की, तुमचे म्हणणे तुम्ही सादर करावे. तर आता काल सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने चर्चेत आलेले विषय आणि तक्रारींची स्पेसिफिक लिस्ट करण्यांत येईल. आणखीन या ठिकाणी अतिरिक्त आयुक्त हयांना मी या प्रकरणी चौकशीकरिता नियुक्त करीत असून, तयार करण्यांत आलेल्या लिस्टच्या अनुषंगाने संबंधित सहाय्यक आयुक्त हयांना पुन्हा एक नोटीस बजावण्यांत येऊन त्यांचा खुलासा मागविण्यांत येईल. त्यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय कोणाच्याबद्दल कोणत्याही

प्रकारची ॲक्शन घेणे योग्य नाही. तेव्हा काल सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने लिस्ट तयार करुन त्यांच्याकडून खुलासा मागविण्यांत येईल त्यांना सात, आठ ते दहा दिवसांची मुदत देण्यांत येईल संबंधित सहाय्यक आयुक्त हया चार ते पाच दिवसांपासून वैद्यकिय रजेवर आहेत. देण्यांत आलेल्या नोटीसीसंदर्भात त्यांचा जो खुलासा येईल त्या संदर्भात अतिरिक्त आयुक्तांच्या अखत्यारीत मी एक समिती गठीत करतो, अतिरिक्त आयुक्त यांनी त्यांचा खुलासा ऐकावा. अतिरिक्त आयुक्तांनी त्यांचा खुलासा ऐकल्यानंतर संबंधित सहा.आयुक्तांविरुध्द कोणती गोष्ट सकृतदर्शनी सिध्द होते आणि कोणती होत नाही हे निश्चित होणे आवश्यक आहे. सकृतदर्शनी ज्या गोष्टी सिध्द होतील त्या अनुषंगाने पुढील प्रॉपर कारवाई आहे डीईची ती सुरु करण्यांत येईल.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्तांचे स्टेटमेंटवर माझी हरकत आहे. तुम्ही हरकत नोंदवून घ्या. मा.आयुक्त महोदय, काल सभागृहात या विषयावर चार तास चर्चा झाली. प्रशासनाने अहवाल सादर केला, काय कार्यवाही केली याचा खुलासा देखिल केला, नोटीस देखिल वाचून दाखविली. प्रशासनातर्फे देण्यांत आलेल्या नोटीसला संबंधित सहाय्यक आयुक्तांनी कुठलेही उत्तर दिलेले नाही. मुदत देखिल संपली आहे हे कार्मिक अधिकारी हयांनी सांगितले आहे, संबंधित परिमंडळाचे उपआयुक्त यांनी देखिल सांगितले, अतिरिक्त आयुक्तांनी देखिल सांगितले आहे. आणि या ठिकाणी मा.आयुक्त सभागृहात अशा प्रकारचे वक्तव्य करीत आहेत तर ही सभागृहाची दिशाभूल नाही का ? आम्ही काय समजायचे ?

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी सभागृहात आयुक्त सो., यांनी निवेदन दिलेले आहे तर सभागृहाची भावना व त्याचबरोबर कायदयाचा जो आधार आहे की , स्थायी समितीमध्ये प्रथम या संदर्भात तक्रार झाली, स्थायी समितीने चौकशीचे आदेश दिले. आणि रिपोर्ट सबमिट करण्याचे आदेश दिले. त्यानंतर काही सन्मा.सदस्यांच्या तक्रारी या प्रकरणी उपलब्ध झाल्या. त्यावर मा.अतिरिक्त आयुक्तांनी संबंधित तक्रारींची चौकशी करण्याचे आदेश दिले. मा.महापौर महोदय, एप्रिल महिन्यात आपल्याकडे स्पष्टपणे महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांचे जाबजबाब घेऊन रिपोर्ट सादर झाला. रिपोर्ट सादर झाल्यानंतर आपल्याला आदेश देण्यांत आले की तांतडीने कारवाई करण्यांत यावी. आमचा कालचा आक्षेप एवढाच होता की, कारवाई करण्यांत आपण दिरंगाई का केली ? या प्रकरणी ५६ अे स्पष्टपणे लागू होतो . ३९७ ब या ठिकाणी स्पष्टपणे लागू होतो. नियम सभागृहात वाचून दाखविला. विधी सल्लागारांनी त्यांचे ओपिनीयन याठिकाणी सभागृहात दिले. उपआयुक्त यांनी पाठविलेल्या रिपोर्टचे कार्मिक सात प्रकारचे कन्क्ल्युजन्स होते ते या ठिकाणी अधिकारी हयांनी सभागृहात वाचून दाखविले. मा.महापौर महोदय, अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाला संरक्षण देणे याबाबतचे गंभीर आरोप सिध्द होत आहेत. त्यानंतर आमचे एवढेच म्हणणे आहे की एवढे गंभीर आरोप सिध्द झाल्यानंतर राज्य शासनाच्या सन २००८च्या परिपत्रकाचा उल्लेख झाला. अधिकाऱ्यांनी जर कुठे अनधिकृत बांधकामाला पाठींबा दिला असेल, निष्काळजीपणा केला असेल त्याबाबतीत जर त्यांचेवर आरोप सिध्द झाले तर कमिटी नेमणे आणि जाबजबाब घेणे, मा.महापौर महोदय, नोटीशीची १५ दिवसांची मुदत संपून आज महिना झाले. कशाला वाट पहायची ? तेव्हा त्या कामावर रुजू होत्या. आम्ही रिपोर्ट वाचले त्यामध्ये एका बीट ऑफिसरने नोंदणी करु नये असे स्पष्ट सांगितले आहे. श्री.शिंदे नावाच्या एका अधिकाऱ्याला, दाबून ठेवले, टेबलखाली लपवून ठेवले, चौकशीमध्ये जाऊ नये याकरिता. त्यांनी कबूली दिली की, अतिक्रमणचे १२ गाळे होते त्या ठिकाणी पाच गाळे कमी करुन ते पेपर काढण्यांत आले. हे सिध्द झालेले आहे. तरी तुम्ही त्यांच्यावर त्वरीत कारवाई करा. त्यानंतर जी काही चौकशी समिती बसवायची आहे ती बसवा. पण कारवाई आधी करा. परवाच या पत्र कसे दिले नाही या कारणाकरिता आपल्याच कार्यालयातील एका माणसाला, क्लार्कला सस्पेंड केले. त्यांना कुठे जाबजबाब विचारला. श्री.संजय घाडीगांवकर आणि श्री.म्हस्के सो., हयांनी काल सभागृहात दोन सहाय्यक आयुक्त पदावरच्या अधिकाऱ्यांची नांवे सांगितली आहेत. अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम संदर्भात मा.आयुक्त सो., आपण तांतडीने कारवाई केली. तरी संबंधित सहाय्यक आयुक्तांना तात्काळ निलंबित करुन मग त्यावर त्यांचे जे काही जाबजबाब घ्यायचे आहेत ते घ्या. आपण एवढी वाट का पहात आहात ? रिपोर्ट वाचल्यानंतर ते अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. आपले महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी हयांनी जाबजबाब दिलेले आहेत. उपआयुक्त परिमंडळने त्या ठिकाणी आपल्याला रिपोर्ट सबमिट केलेले आहेत. अशा परिस्थितीत त्यांना तात्काळ निलंबित करुन मग पुढची कार्यवाही करण्यांत यावी. कायदयात देखिल तरतूद आहे आणि कायदयाच्या आधारे आपल्याला हे करावे लागेल. अशा प्रकारचे गंभीर आरोप असतांना त्यांची पाठराखण करण्याची काय

आवश्यकता आहे आहे, कालची भूमिका देखिल आम्हाला पटत नाही. कारवाई करण्यांत आपण एवढी दिरंगाई का करीत आहात ? परिमंडळाचा रिपोर्ट चुकीचा आहे की, त्या ठिकाणी झालेले जाबजबाब चुकीचे आहेत का ? मा.महापौर महोदय, कोपरी प्रभाग समितीची स्थापना झाली, कोपरी प्रभाग समितीचा त्यांनी चार्ज घेतला तेव्हापासून संबंधित सहाय्यक आयुक्तांचा नगरसेवक आणि अध्यक्षांनी चेहेरा देखिल पाहिलेला नाही. आणि चार्ज घेतल्यापासून पहिल्या दिवशीच त्यांनी त्या ठिकाणी जे उद्योग सुरु केले आहेत, ॲन्टीकरप्शनचा ट्रॅक लागला हे समजल्यानंतर त्या सुट्टीवर निघून गेल्या. मा.महापौर महोदय, अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घातल्यामुळे आम्हाला संशय येतो. त्यांचे बाबतीत सर्व पुरावे सिध्द झालेले आहेत, असे असतांना आपण त्यांना तातडीने निलंबित का करीत नाही ? हेच प्रश्न आमच्यासमोर आहेत. आणि मिळालेले उत्तर आम्हाला समाधानकारक वाटत नाही. मा.महापौर महोदय, आम्ही प्रोसिजर पूर्ण केलेली आहे. स्थायी समितीत चर्चा केली. झालेल्या आरोपांवर रिपोर्ट पूर्ण झाले.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, काल या ठिकाणी सभागृहात जी चर्चा झाली आणि सभा तहकूबीसाठी माजी महापौर आणि या सदनाचे जेष्ठ सदस्य श्री.अशोक वैती सो., यांनी सभा तहकूबी देखिल मांडली, सर्व सभागृहाने एक मताने निर्णय घेतला आपण तसे आदेश पारित केलेले आहेत आणि आज आयुक्त सो., यांचे वक्तव्यावर मी हरकत घेतली आहे. आपण रुलींग दयावे. मला त्याचा खुलासा हवा आहे.

**मा.आयुक्त :**

सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह, आरोप झालेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची बाजू ऐकल्याशिवाय आपण त्यांच्यावर ॲक्शन घेत नाही. त्यामुळे संबंधित सहाय्यक आयुक्तांचे म्हणणे ऐकल्याशिवाय मी त्यांचेवर ॲक्शन घेऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे माझ्याकडे नगरसेवकांच्या डिस्कॉलिफकेशनची प्रकरणे आहेत त्यामध्ये देखिल मागील एक वर्षापासून त्यांना मुदत देऊन त्यांचे म्हणणे मी ऐकून घेत आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच मी ते पुढे पाठवत आहे. आणि त्यांच्याकडून देखिल वेळ घेत आहे. कोणाच्या बद्दल कोणी हरकत घेतली तर त्यांच्याकडून खुलासा घेणे, त्यांचे म्हणणे ऐकणे मला बंधनकारक आहे. योग्य आहे. तर माझी विनंती आहे की त्यांना ऐकल्याशिवाय, ठिक आहे आतापर्यंत जे रिपोर्टस् दिलेले आहेत त्यामध्ये त्यांचे स्टेटमेंट नाही. त्या जाणूनबुजून टाळाटाळ करीत आहेत किंवा काय हे आता समजून येईल. पण त्यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय निलंबनाची कारवाई मी करणार नाही. त्यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय एकतर्फी निर्णय मी देणार नाही, देऊ शकत नाही. आणि आपण देखिल आग्रह धरु नये अशी माझी विनंती राहील. कोणाची तरी पाठराखण करण्याच्या उद्देशाने मी हे करीत नाही. तर त्यांचा देखिल म्हणणे मांडण्याचा अधिकार असतो. जर त्या जाणूनबुजून उशिर करीत आहेत किंवा टाळाटाळ करीत आहेत असे स्पष्ट झाले तर त्याची नोंद घेऊन आपण त्याचेवर कारवाई करु शकू. हा पाठराखण करण्याचा मुद्दा नाही. परंतू अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय अशा प्रकारची कारवाई करता येणार नाही. निलंबन ही आपल्याला शिक्षा वाटत नसेल, तरी देखिल ती एक शिक्षा असते हे सगळयांना माहित्ती आहे. तर शिक्षा करण्यापूर्वी माझ्या ...काऱ्या अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे आणि कायदेशीर जबाबदारी देखिल आहे. जसे मी इतरांचे म्हणणे ऐकून घेतो तसेच मी त्यांचे देखिल म्हणणे ऐकून घेईन आणि जर त्या आल्या नाहीत, जसे आपण या ठिकाणी सांगितले आहे की, त्यांना नोटीस देऊन पंधरा दिवसापेक्षा कधी काळ झालेला आहे, तर या सर्वांचा विचार करुन आम्ही फायनल निर्णय घेऊ. पण इथे आपली भावना लक्षात आली, चर्चेचा सूर लक्षात आला, आपण जे एखादया व्यक्तीचे नांव सांगितले,पर्टीक्युलरली अनधिकृत बांधकामाबाबतचा मुद्दा सांगितला त्या सगळयाची चौकशी होऊन त्यावर कारवाई होईल. परंतू भावनावेशामध्ये संबंधित सहाय्यक आयुक्तांचे म्हणणे न ऐकता या फोरमवर त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्याचा आग्रह आपण धरु नये अशी माझी विनंती राहील.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, यापूर्वी सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना त्यांचे संदर्भात तक्रार दाखल झाल्यावर तांतडीने सस्पेंड केलेले आहे. महापालिकेत ही कारवाई आपण केलेली आहे. आणि या अधिकाऱ्यांना देण्यांत आलेली मुदत साडेपाच महिन्यांची आतापर्यंत दिली गेली आहे. एवढया कालावधीत त्यांना कोणत्याही प्रकारची काळजी नाही किंवा बोलाविल्यानंतर त्या येत देखिल नाहीत. उत्तर देण्याबाबतची त्यांची मुदत संपून दोन ते अडीच महिने देखिल झाले आहेत. म्हणजे नैसर्गिकरित्या त्यांना वेळ दयायची होती. रिपोर्ट सबमिट झाल्यानंतर आपली स्वतःची बाजू मांडणे याबाबत अजिबात त्यांना याची काळजी नाही आहे. म्हणजे हेतूपुरस्सर कुठेतरी

दिरंगाई करायची, आणि मग सर्व थंड होते अशा प्रकारे हे सर्व चालू आहे. तरी आपण यापूर्वी केलेल्या कारवाईप्रमाणे ही कारवाई देखिल तांतडीने करु शकतो.

**मा.आयुक्त :**

आपण सस्पेंशनची कारवाई करीत नाही असे नाही. आपण अनेक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर अशा प्रकारची कारवाई करतो. आणि त्यांच्यावर डीईची प्रोसेस सुरु होते असे देखिल आहे. तथापी ही केस माझ्याकडे आलेली आहे आणि कुठल्याही प्रकारे ही केस महानगरपालिका प्रशासनाकडून थंड करण्याचा प्रयत्न होत आहे असा प्रकार कुठेही नाही. फक्त एवढेच आहे की, मी त्यांना एक संधी देऊ इच्छितो की, तुम्ही तुमचे म्हणणे माझ यासमोर येऊन मांडा. आणि प्रत्येक इंडिव्हीज्युअल केसबाबत तुम्ही येऊन सांगा की या केस मध्ये काय झाले होते. ? आणि त्यानंतर जे काही योग्य मुद्दे ज्याबाबत त्या समाधानकारक खुलासा देऊ शकतील ते मान्य करण्यांत येतील आणि जर त्या समाधानकारक खुलासा देऊ शकल्या नाहीत तर त्यांचेवर कारवाई करण्यांत येईल. प्रकरण थंड करण्याचा हा प्रशासनाचा प्रयत्न आहे असे कृपया समजू नका. पण माझ्या अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेणे ही माझी जबाबदारी आहे आणि त्यानंतरच त्यावर मी योग्य ती पुढील कारवाई प्रस्तावित करेन. तरी इथे याच वेळी संबंधित सहाय्यक आयुक्तांना निलंबित करावे अशा प्रकारचा आग्रह धरण्यांत येऊ नये. प्रशासनाचे अधिकारी ही माझी जबाबदारी आहे आणि मी त्यांचे म्हणणे ऐकणार. त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर मी पुढील कारवाई करणार .

**श्री.अशोक वैती :**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी ज्या तक्रारी करण्यांत आलेल्या आहेत त्या कुठल्याही नागरिकांच्या तक्रारी नाहीत. प्रशासनाच्या वतीने त्याबाबत अभिप्राय दिलेला आहे. आणि अशा प्रकारचा अभिप्राय दिल्यानंतर देखिल एवढी दिरंगाई होणे चुकीचे वाटते. नाही तर दिलेला अभिप्राय चुकीचा आहे असे वाटते. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांची चुकीचा अभिप्राय दिलेला आहे त्यांचेवर कारवाई करण्यांत यावी. अन्यथा चौकशी न करता सस्पेंशन लावा आणि दोषी आढळल्या नाहीत तर त्यांना पुन्हा सेवेत घ्या. आज आपले जबाबदार अधिकारी आहेत, आणि त्यांच्या त्याच लेवलच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर ठपका ठेवलेला आहे. आणि अशा परिस्थितीत मा.आयुक्त सो., एक चांगला निर्णय झाला पाहिजे की, त्यांचे सस्पेंशन करा, आठ दिवसांत त्यांची चौकशी लावा आणि दोषी आढळल्या नाहीत तर पुन्हा त्यांना सेवेत घ्या.

**श्री.नरेश म्हस्के :**

मा.महापौर महोदय, आताच सन्मा.माजी महापौर श्री.अशोक वैती हयांनी हा जो मुद्दा मांडला आहे की, ही जी प्रक्रिया आहे, किंवा जो अहवाल या ठिकाणी आलेला आहे, तो संबंधित सहाय्यक आयुक्त ज्या अधिकाऱ्यांना रिपोर्ट करतात अशा त्यांच्या वरच्या अधिकाऱ्यांनी केलेला आहे. मग त्या माणसांनी केलेल्या तक्रारी खोटया आहेत का ? मग काल आम्ही ज्या अहवालाच्या कॉपीज मागितल्या त्या आम्हाला मिळालेल्या आहेत. अतिशय गंभीर स्वरुपाचा अहवाल आहे, आणि संबंधित सहाय्यक आयुक्तांच्या वरच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या या अहवालाचे जाहिर वाचन केले तर अनेक भयानक गोष्टी त्यातून निघणार आहेत. म्हणजे नागरिकांच्या तक्रारीवर आम्ही बोलत नाही, तर त्यांच्या वरिष्ठांनी अहवाल दिलेला आहे. त्यावेळेच्या अनधिकृत बांधकामाचा अहवाल फोटोसकट दिलेला आहे. त्यावर त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत की नाही याची देखिल या मध्ये यादी आहे. ही माहिती आम्हाला स्थायी समितीत मिळालेली आहे. आणि ही यादी काही आम्ही दिलेली नाही तर तुमच्या अधिकाऱ्यांनी दिलेली आहे. आणि जर तुमच्या काळात अनधिकृत बांधकामे होत असतील आणि त्याला नोटीस मिळत नसेल. आणि मिळालेल्या नोटीसमध्ये त्यांची बदली झाल्यानंतरची तारीख दिली जात असेल, आणि ते बांधकाम आहे त्यांच्या आधीचे आणि त्यावर तारीख खोटी लिहीण्यांत आलेली आहे. ही सगळी कागदपत्रे आहेत आणखी काय पाहिजे ?

**मा.आयुक्त :**

मा.महापौर, हया रिपोर्टमध्ये जे आरोप ठेवण्यांत आलेले आहेत, त्याबाबत त्यांचे म्हणणे ऐकायचे आहे. आणि हा रिपोर्ट जर चुकीचा असेल तर चुकीचा रिपोर्ट ठेवणाऱ्यावर कारवाई होईल आणि रिपोर्ट बरोबर असेल तर संबंधितांवर कारवाई होईल. पण दोन्ही बाजू ऐकल्यावर कारवाई होईल.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, दि.४.४.२०१४ रोजी उपआयुक्त परिमंडळ ३ यांनी सहाय्यक आयुक्त श्रीमती अंडे हयांना पत्र दिलेले आहे. आणि विहीत तारखेला विहीत वेळेत आपण उपस्थित रहावे आणि उपस्थित न राहिल्यास आपले काही म्हणणे नाही असे समजून या संदर्भात निर्णय घेण्यांत येऊन अहवाल सादर करण्यांत येईल अशी नोंद घ्यावी अशा आशयाचे पत्र दिलेले आहे. लेखी स्वरुपात सर्व कायदयाच्या कक्षेत आपल्या महानगरपालिकेच्या

उपआयुक्तांनी त्यांना समज दिली. त्यांना ताकिद दिली की आपण उपस्थित रहावे अशा नोटीस व्यवस्थित देण्यांत आलेल्या आहेत की तुम्ही सुनावणीला का येत नाही ? निर्णय घेतांना तो एकतर्फी होईल तेव्हा तुम्ही उपस्थित रहावे असे त्यांना कळविले आहे. परत आपल्याच अधिकाऱ्यांच्या रिपोर्टवर थोडेफार निग्लीजन्स असेल तर आपण समजू शकतो परंतू हे अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत काल फोटो सादर करण्यांत आलेले आहेत, आपण घोडबंदर रोडवर संपूर्ण पहाणी करुन त्या ठिकाणी अनधिकृत गाळे निष्कासीत करण्यांत यावेत अशा आशयाची नोटीस संबंधितांना दिलेली होती, आजूबाजूचा सर्व घोडबंदर रोड अतिक्रमण मुक्त झालेला असतांना रोडवर मध्ये मात्र गाळे उभे राहिले. त्या गाळयांना नोटीस देण्यांत आलेली नाही. रिपोर्टमध्ये उल्लेख आहे. त्या गाळेधारकांची नांवे पाहिजे तर मी आपणांस वाचून दाखवितो. श्री मन्वाचार्य -लोडबेअरींग गाळा, बांधकामावर कारवाईची विस्तृत माहिती नाही. बांधकाम तोडल्याचा अहवाल नाही, अनधिकृत बांधकामाची कोर्टात नोंद नाही, मेन रोडवर हे गाळे आहेत, लोकांनी अनधिकृत बांधकाम झाल्याबाबतची तक्रार केलेली आहे. ते आपल्याकडे इन्वर्ड आहे. आणि सांगत आहेत की, आमच्या निदर्शनास आले नाही. उमर अहमद अली, कासारवडली, आर.सी.सी. तळ अधिक चार मजल्यांचे बांधकाम, त्याच्यात तर गाळेच गायब केले आहेत. आपल्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, बीट मुकादम हयांनी नोटींग केलेले आहे, त्यांचा जबाब आहे की मला स्पष्टपणे सहाय्यक आयुक्तांनी सांगितले होते की तुम्ही अतिक्रमणची नोंदणी जोपर्यंत मी सांगत नाही तोपर्यंत नोंदणी करावयाची नाही. असा त्यांचा आणि ड्रायव्हरचा जबाब आहे. कार्यालयीन जबाब आहे एका माणसाला १०,००० रुपये मागितले याबाबत. श्री.शिंदे नावाचा एक कर्मचारी मागील महिन्यात निवृत्त झाला, त्याला केबीनमध्ये डांबून ठेवला होता आणि शिवीगाळ केली होती. त्याचा जबाब आहे की, तो निवृत्त झाला आहे त्याचा जबाब आहे की, मॅडमने ते पान फाडून टाकले आहे. १२ गाळे आहेत. त्यातील पाच गायब करुन टाकले होते. अशा प्रकारचे गंभीर आरोप अनधिकृत बांधकामासंदर्भात होते. आणि अशा प्रकारे वारंवार आठ महिन्यांपासून त्यांना सांगत होतो की, घोडबंदर रोड येथे लॉजिंग आणि बारचे प्रमाण वाढले आहे ते कुठेतरी थांबवा. आमचे स्थानिक नगरसेवक श्री.नरेश मणेरा हयांनी सांगितले होते की, मॅडम माझा प्रभाग आहे. माझ्या प्रभागात अमुक अमुक कामे आहेत, त्यावर मी जाऊन बघते अशा स्वरुपाचे उत्तर मिळत असे. मन्वाचार्याबाबत आमची तक्रार असतांना त्याबाबत कारवाई होत नाही. १२-१२ गाळे रस्त्यावर होत असतील, तर लोकांना रस्त्याकरिता जागा सोडायला आम्ही लोकप्रतिनिधी कशा प्रकारे प्रवृत्त करु शकणार ? यावर कारवाई काहीच नाही. आता निपुर्ते सों., यांनी शब्द दिला आहे कार्यवाही करतो, बघू या. अशा प्रकारचे गंभीर आरोप अनधिकृत बांधकामांसंदर्भात असतांना, कायदयात तरतूद आहे, त्यांची सुनावणी झालेली आहे. सिध्द झालेले आहे, मा.आयुक्त सो., यांचे म्हणणे आहे की, त्यांचा खुलासा ऐकल्याशिवाय मी पुढे कारवाई करणार नाही तर सुनावणीसाठी त्यांना नोटीस दिलेली आहे. तर माझे म्हणणे आहे की, आयुक्तांनी जबाबदार अतिरिक्त आयुक्तांवर सोपविली आहे, अतिरिक्त आयुक्तांनी ती परिमंडळ उपआयुक्तांना दिलेली आहे. डेलिगेशन ऑफ पॉवर्स हया ठिकाणी आपण दिलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी पूर्ण अहवाल पाठविला आहे. त्यानंतर त्यांनी कार्मिक विभागाला नोटीस पाठविण्यास सांगितले, त्याप्रमाणे कार्मिक विभागामार्फत देखिल सांगण्यांत आले की नोटीस देऊन महिना होऊन गेला आहे, परंतू त्यांच्याकडून उत्तर काही मिळत नाही. असे स्पष्टपणे त्यांनी सभागृहात सांगितले आहे. आणि असा प्रकार झाल्यानंतर मला वाटत नाही की, त्यांना पुन्हा वेळ देणे आवश्यक आहे, तर त्यांना तांतडीने सस्पेंड करा आणि ३५६ अ प्रमाणे त्यांच्यावर कारवाई करा. आणि त्यानंतर चौकशीचा जो अहवाल येईल त्याप्रमाणे आपण मग निर्णय घ्या. पण त्या अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहीत करीत आहेत तेव्हा त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

**श्री.गिरीष राजे :-**

मा.महापौर महोदय, मी देखिल एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊइच्छितो की, श्रीमती अंडे मॅडम कोपरी प्रभाग समितीकडे आल्या आणि ठाणे पूर्व येथे जी जकात नाक्याची जकात चौकी होती आनंद टॉकीजच्या बाजूला होती ती चौकी ती तिथून हटवून RTO पोलिस चौकीच्या जवळ नेऊन ठेवली आहे. त्याठिकाणी जकात चौकीची जी जागा मोकळी झाली त्या ठिकाणी नविन चार ते पाच टपऱ्या पडल्या. उदया जर जकात पुन्हा चालू झाले तर जकात चौकीकरिता जुन्हा जागा शोधावी लागणार आहे. तेव्हा जकात चौकी हलविण्याचे काय कारण होते हे समजू शकलेले नाही. आपली अधिकृत चौकी तिथून का हलविली ?

**मा.आयुक्त :**

सन्मा.महापौर महोदय, सन्मा.सभागृह, संबंधित सहाय्यक आयुक्तांवर करण्यांत आलेले आरोप हे गंभीर आरोप आहेत. आणि म्हणूनच मी त्यांची चौकशी लावण्याबाबत बोलत आहे. जर आरोप गंभीर नसते तर मी इथपर्यंत देखिल गेलो नसतो. आरोप गंभीर आहेत, आणि आता त्यांची देखिल एक तक्रार माझ्याकडे आली आहे

e

रिपोर्टमध्ये त्या प्रकारे **डॉक्टरींग** होत आहे का. आपली चर्चा होण्यापूर्वी माझे असे मत होते की, या करिता एका वेगळया उपआयुक्तांची नियुक्ती करावी की ज्या चौकशी अधिकाऱ्यांबाबत संबंधित सहाय्यक आयुक्तांची देखिल काही तक्रार नसेल. ज्या पध्दतीने एखादया मा.कोर्टात आपली केस असते आणि त्यावेळी आपल्याला जेव्हा नि:पक्षपातीपणाची शंका येते त्यावेळी कोर्ट देखिल आपण बदलून मागतो. यामुळे मला असे वाटते की, ही बाब इतकी गंभीर आहे त्यामुळे आता हे पेपरमध्ये देखिल येणार आणि आपली प्रतिमा मलिन होणार त्यामुळे साधकबाधक चर्चा शेवटपर्यंत झाली पाहिजे. आणखी एक गोष्ट म्हणजे ज्याने हा रिपोर्ट बनविला आहे जर रिपोर्ट चुकीचा असेल तर त्या रिपोर्ट बनविणाऱ्यांवर ॲक्शन व्हायला पाहिजे आणि जर रिपोर्ट बरोबर असेल तर संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकूनच आपल्याला निर्णय घेणे आवश्यक आहे. आता मी ॲडिशनल कमिशनर हयांना एवढयाकरिताच चौकशीकरिता नियुक्त करण्याबाबत बोलत आहे की, एका कर्मचाऱ्याने जर खुलासा दिलेला आहे की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी कागद फाडला. तर वरिष्ठांच्या सांगण्यावरुन कागद फाडणारा देखिल तेवढाच गुन्हेगार होतो. हे एवढे सोपे नाही की आम्ही बोललो आणि बाजूला झालो. ज्यांनी फाडले ते देखिल गुन्हेगार होणार आणि ज्यांनी १२ ऐवजी ५ केले असेल ते देखिल गुन्हेगार होणार. ही सिरीयस गोष्ट आहे. याबाबत आपल्याला शेवटपर्यंत जायचे आहे. आणि अतिरिक्त आयुक्तांना मी दोन्ही बाजू स्वतंत्र्यरित्या ऐकून घेऊन त्यांना निर्णय घ्यायला सांगत आहे. कोणत्याही प्रकारे प्रकरण थंड करण्याचा हा विषय नाही ही पहिली गोष्ट आहे. दुसरी गोष्ट अशी की, ज्या वेळेला अत्यंत सिरीयस बाबीमध्ये एखादयाला निलंबित करण्याची वेळ येते तेव्हा दोन्ही बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे, शिवाय मी अतिरिक्त आयुक्तांना हे देखिल सांगत आहे की, हया रिपोर्टमध्ये ज्या लोकांचे जाबजबाब आहेत त्या प्रत्येक व्यक्तिला स्वतंत्र बोलावून घ्या. जर एक कर्मचारी असे सांगत आहे की, हयांच्या दबावाखाली मी तो कागद फाडून टाकला तर एखादी बाब अशी देखिल पुढे येईल की हयांच्या दबावाखाली मी काहीतरी लिहून दिले. मी त्याच्यावर भरोसा करायचा का की ज्यांनी कागद फाडला आहे. तर याकरिता या प्रकरणाची चौकशी होणे अत्यावश्यक आहे. तरी या प्रकरणी आपण प्रथम चौकशी पूर्ण करु ही अत्यंत गंभीर बाब आहे. आणि कोणातरी एकाला या प्रकरणी **पे** करावे लागेल. घटना जी घडली असेल तर ज्यांनी घडविली असेल त्यांना तरी याचे परिणाम भोगावे लागणार किंवा अशी गोष्ट इतकी सिरीयस नसेल परंतू सिरीयस दाखविण्यांत येत आहे त्यांना याचे परिणाम भोगावे लागणार. कोणावर तरी ॲक्शन होणारच. हे प्रकरण प्रशासन गंभीरतेने घेत आहे. परंतू कृपा करुन हया सभागृहात अधिकाऱ्यांना चौकशी न करता निलंबित करण्याचा आग्रह धरु नये.

**मा.विरोधी पक्ष नेते :**

मा.महापौर महोदय,या संदर्भात माझा एकच प्रश्न आहे. आपल्या महानगरपालिकेत वॉर्ड ऑफिसर, दर्जाचे सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे. निलंबित करतांना त्या वेळेला कोणती प्रोसिजर अवलंबिली होती. असे किती अधिकारी निलंबित केले आहेत आणि त्या वेळेला कोणती प्रोसिजर केली ? याची माहिती मिळावी.

**मा.उपआयुक्त ( मुख्यालय)**

मा.महापौर महोदय, सद्य:स्थितीत आता कोणीही सहाय्यक आयुक्त निलंबित नाही. परंतू यापूर्वी निलंबनाच्या ज्या कारवाया झालेल्या आहेत त्या त्यांच्या रिपोर्टच्या आधारावर आणि त्यांची DE झालेली होती त्या आधारावर कारवाया करण्यांत आलेल्या आहेत.

**मा.विरोधी पक्ष नेते :**

ऑन द स्पॉट एकाही अधिकाऱ्यास निलंबित करण्यांत आलेले नाही असे आपले म्हणणे आहे का ?

**मा.उपआयुक्त (मुख्यालय)**

मा.महापौर महोदय, माझ्या काळात तर एकही .. ..

**श्री.नजीब मुल्ला :**

आपण उपआयुक्त (मुख्यालय म्हणून या ठिकाणी उत्तर देत आहात. आम्ही आपल्याला प्रश्न व्यक्तिगत विचारलेला नाही.

**मा.आयुक्त :**

ऑन द स्पॉट सस्पेंशन होतात. परंतू त्या वेळेच्या परिस्थितीनुसार ऑन द स्पॉट सस्पेंशन होतात. ऑन द स्पॉट ते उभे आहेत, त्यांच्यासमोर चालू आहे आणि ते काही करीत नाहीत असे जर झाले तर त्यांना देखिल ऑन द स्पॉट निलंबित करु.

**मा.विरोधी पक्ष नेते :**

मा.महापौर महोदय, आयुक्त सो.,चा काही तरी गैरसमज होत आहे. ऑन द स्पॉट ते उभे आहेत, ते वाकले, ते हसले, ते गेले म्हणून नाही. त्यांनी कामामध्ये अनियमितता दाखविली हे आपल्या निदर्शनास आल्यानंतर प्रशासनाकडून निलंबित करण्यांत आले आहेत.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, ८.५.२०१३ चा एक आदेश मला मिळालेला आहे.आणि या आदेशावर आयुक्त म्हणून श्री.शामसुंदर पाटील सो., यांची सही आहे. त्याच्यात त्यांनी जसे आपण म्हणालात की आम्हाला फोन येतात माणूसकीच्या पार्श्वभूमीवर, की आम्हाला दोन दिवसांची मुदत दया, चार दिवसांची मुदत दया.. ..

**श्री.सुहास देसाई :**

मा.महापौर महोदय, ते कृपया फोन कोणाचे येतात हे सभागृहाला कळावे.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, विरोधी पक्ष नेते सो. आणि आम्ही कबूल केले आहे की फोन येत असतील. पण हा रिपोर्ट पहा. वेळेवर कारवाई प्रस्तावित झाले आणि तरी देखिल अनधिकृत बांधकाम झाले असा रिपोर्ट नाही आहे. आर्थिक व्यवहार होऊन मुद्दाम कामांना प्रोत्साहित केले आणि कामे व्हायला लावली. खाली दि.८.५.२०१३ च्या मा.आयुक्तांचे परिपत्रकानुसार अधिकार प्रदान केलेल्या बीट ऑफिसर पासून कर्मचाऱ्यांना दमदाटी करुन तुम्ही तुमची कामे करु नका, शहाणपणा करु नका, तुम्ही नोटींग करु नका हे परिपत्रक फॉलो करु नका असे सांगितल्याबाबतचे आरोप आहेत. एका पदावर बसून मुद्दाम अनधिकृत बांधकामाला प्रोत्साहित केले आहे. अशा प्रकारचे आरोप आहेत. आणि आपल्याच उपआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांने केलेल्या चौकशीवर आपण संशय व्यक्त करीत आहोत की, परत आपण चौकशी करु. याच्यात एक अनधिकृत बांधकाम वाढत होते म्हणून कारवाई झाली होती, चौकशी नेमली होती. आणि चौकशीमध्ये एवढया मोठया प्रमाणावर निघेल याची कल्पना आम्हाला देखिल नव्हती. आणि एवढया मोठया प्रमाणावर तेथे कामकाज चालू आहे याची कल्पना स्थायी समितीच्या सदस्यांना देखिल नसेल. म्हणून आमची विनंती आहे की, या बाबतीत मा.महापौर महोदय, संबंधित सहाय्यक आयुक्तांना आपण सर्वतोपरी संधी यापूर्वी दिलेली आहे. आणि त्यांच्यावर असा आरोप नाही की, अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली नाही तर त्यांच्यावर हा आरोप आहे की, त्यांनी अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन दिले. अनधिकृत बांधकाम करायला लावले हे आरोप गंभीर स्वरुपाचे आहेत. हया ठिकाणी सन्मा.विरोधी पक्ष नेते श्री.हणमंत जगदाळे सो., यांनी सांगितले आहे की, यापूर्वी आपण अनेक सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना जागेवर निलंबित करुन त्यांची चौकशी लावली आहे. प्रथमदर्शनी पुरावे असल्याचा उल्लेख त्यांच्या रिपोर्टमध्ये होता. आणि नंतर त्यांची चौकशी आपण केलेली आहे. आमची मागणी तीच आहे.

**मा.सभागृह नेते :**

मा.महापौर महोदय, लकी कंपाऊंड-मुंब्रा येथील घटना घडली त्यावेळी जो अधिकारी त्या ठिकाणी नव्हता, त्यांचे पोस्टींगच त्या ठिकाणी झालेले नाही अशा माणसाला, श्री. दिलीप शिंदे हयांना आपण तात्काळ निलंबित केले. आणि नंतर प्रशासनाच्या लक्षात आले मग त्याला कामावर घेतले. परंतू तात्काळ सस्पेंड केले. मा.आयुक्त महोदय, मा.महापौर महोदय, ठिक आहे त्यांच्या उपआयुक्तांनी त्यांच्या संदर्भात काही चुकीचा अहवाल दिलेला असेल, परंतू त्यांच्या काळात झालेले जे बांधकाम आहे, ३५-३५ खोल्या. १३ खोल्या एका ठिकाणी, एका ठिकाणी चार मजल्यांचे बांधकाम वन प्लास टू ची शाळा हे सगळे बांधकाम तर त्या ठिकाणी आहे. आणि या बांधकामाला साधी नोटीस देखिल नाही. हे तुमच्या अधिकाऱ्यांचे रेकॉर्ड आहे. त्या बांधकामाला साधी नोटीस देखिल दिलेली नाही. हा हलगर्जीपणा नाही का ?

**मा.महापौर :**

मा.आयुक्त महोदय, आठ दिवसांपूर्वी हया ठिकाणी श्री.बुरपल्ले हयांना चार्ज दिलेला आहे. त्यांचा देखिल अहवाल आहे की, एवढे बांधकाम चालू आहे. त्यांचा अहवाल देखिल बघण्यांत यावा. आणि त्यांनी देखिल नमुद केलेले आहे की, कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही. एका उपआयुक्तांनी दिलेल्या अहवालावर तुमचा संशय असू शकतो. परंतू श्री.बुरपल्ले हे त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांची लगेच परिवहनला बदली करण्यांत आली आहे. त्यांचा देखिल रिपोर्ट आपण बघा.

**मा.आयुक्त :**

मा.महापौर महोदय, मा.सभागृह, एखदया व्यक्तीच्या विरोधात रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर त्या व्यक्तीला त्या संदर्भात विचारणा करणे किंवा त्यांचेकडून खुलासा मागणे हयाचा अर्थ असा नाही की त्या रिपोर्टवर किंवा रिपोर्ट तयार करणाऱ्या व्यक्तींवर आपण संशय घेत आहोत. पण वस्तुस्थिती समोर येण्यासाठी ज्यांच्याबद्दल आपण निर्णय घेणार आहोत त्यांचे प्रत्यक्ष म्हणणे ऐकणे गरजेचे आहे. मला प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत मी त्यांना देऊन त्या संदर्भात त्यांचे म्हणणे विचारणार याचा अर्थ असा नाही की , आम्ही डिसाईड केले की, समोर आलेला रिपोर्ट हा चुकीचा आहे. परंतू त्याचवेळी आपण असे देखिल म्हणू शकत नाही की, हया ठिकाणी प्राप्त झालेला रिपोर्ट अगदी बरोबर आहे आणि संबंधित व्यक्तीला त्वरीत निलंबित करुन टाकू.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, माझी हरकत आहे आयुक्तांच्या मुद्दयावर. या सभागृहात झालेली चर्चा योग्य नाही, दिलेला अहवाल योग्य नाही ? म्हणजे त्यांच्या अधिकाऱ्यांवर त्यांचा विश्वास नाही आहे.

**श्री.नबीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, याचा अर्थ संबंधित उपआयुक्त,कार्यकारी अभियंता, बीट ऑफिसर हया सर्वांचा अहवाल चुकीचा आहे ?

**मा.आयुक्त :**

मा.महापौर महोदय, मा.सभागृह, मी काय म्हटले की अहवालावर कोणाचे म्हणणे मागविणे म्हणजे अहवाल चुकीचा आहे असे म्हणणे नसते. पण अहवालात ज्यांच्यावर ठपका ठेवण्यांत आलेला आहे त्यांना ऐकणे हे गरजेचे आहे. संबंधितांना ऐकणे म्हणजे अहवाल चुकीचा आहे असा अर्थ कृपया काढू नये.

**मा.विरोधी पक्ष नेता :**

मा.महापौर महोदय, मी अशी विनंती केली आहे की, यापूर्वी जे अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त निलंबित केले आहेत त्यावेळी ही प्रक्रिया फॉलो केली होती का ? उपआयुक्त ( मुख्यालय) यांनी त्यांचे अजून उत्तर दिलेले नाही. त्यांच्याकडे नावे नसतील तर, ती नांवे पाहिजे तर त्या अधिकारी/सहाय्यक आयुक्तांची मी आपल्याला नांवे देतो.

**मा.सभागृह नेता :**

मा.महापौर महोदय, एखादया ठिकाणी ३५ खोल्या आणि एखादया ठिकाणी १३ खोल्या बांधल्या जात आहेत आणि त्या ठिकाणी साधी नोटीस देखिल दिली जात नाही. सहाय्यक आयुक्तांचे ते काम नाही का ? तुमचा रिपोर्ट म्हणतो आहे की, त्या ठिकाणी साधी नोटीस देखिल दिलेली नाही. ठाणे महानगरपालिकेच्या रिपोर्ट मध्ये हयाची नोंद आहे. सहाय्यक आयुक्तांचे हे काम नाही का ?

**मा.आयुक्त :**

मा.महापौर, मा.सभागृह , हे सहाय्यक आयुक्तांचे काम आहे. आणि जर त्यांच्या खुलाशामध्ये असे लक्षात आले की, त्यांचेकडे याबाबत विचारणा केल्यानंतर कोणताही समाधानकारक खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचेवर कारवाई होणारच. माझे म्हणणे असे आहे की, पहिला मुद्दा असा आहे की, त्यांनी या अनधिकृत बांधकामांना साधी नोटीस देखिल दिली नाही हा जो मुद्दा आहे त्याबाबत प्रथम त्यांना ऐकणे गरजेचे आहे. दुसरा मुद्दा असा की, कोणतीही गोष्ट एकतर्फी नसते. नोटीस कोणी बनवून ठेवली होती का, हे फक्त सहाय्यक आयुक्तांनाच कळणार का, घडलेल्या घटनेबाबत त्या ठिकाणी कोण कोण रिस्पॉन्सिबल आहेत त्यांचे म्हणणे ऐकून सगळयांवर ॲक्शन घ्यावी लागेल. या फक्त एका व्यक्तीला सुळावर चढवून सर्व परिस्थिती ठिक होणार नाही. या संदर्भात जी काही कार्यवाही आहे, नोटीस देणे ही फक्त सहाय्यक आयुक्तांची जबाबदारी/काम आहे का ? खालील अधिकाऱ्यांनी माहिती दिली आणि त्यांनी सही दिली नाही असे आहे का ?

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, याच मुद्दयावर मला आयुक्तांना विचारणा करायची आहे, आपल्या चौकशीमध्ये जे दिलेले आहे ते मी वाचून दाखवितो.

( अहवालातील मुद्दा वाचून दाखवितात ).

मा.महापौर महोदय, परिमंडळाचे उपआयुक्त आणि मुख्यालय उपआयुक्त हयांचे कडून आदेश निर्गमित होऊन देखिल कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे १४-१४ ऑर्डरर्स लेखी स्वरुपात दिलेले असतांना देखिल संबंधित सहाय्यक आयुक्तांनी कारवाई केलेली नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांप्रमाणे अंमलबजावणी करण्यास त्यांना वेळ नाही हे त्यावरुन सिध्द होत आहे. अतिरिक्त आयुक्त, परिमंडळ उपआयुक्त, उपआयुक्त मुख्यालय या सर्वांचे आदेश होते.

**मा.आयुक्त :**

मा.महापौर, मा.सभागृह हा आरोप आहे की, त्यांनी अतिरिक्त आयुक्तांचे आदेशाचे पालन केले नाही. हा आरोप त्यांच्यासमोर जाणार आणि त्याबाबत त्यांना खुलासा मागविण्यांत येईल की तुम्ही कारवाई का केली नाही ? त्यांच्यावर करण्यांत आलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत, जर हे आरोप झाले नसते ना तर चौकशीचा प्रश्नच आला नसता. अनधिकृत बांधकामांना नोटीस दिली नाही किंवा १४-१४ वेळेला लेखी आदेश देऊन कारवाई केली नाही हया आरोपांबद्दल त्यांचेकडून खुलासा मागविणे आवश्यक आहे. ते म्हणतील की चुकीचे आहे असे झालेच नाही, ते सिध्द होईल किंवा नाही होणार, परंतू त्यंचे म्हणणे ऐकणे गरजेचे आहे. पण हया ठिकाणी सभागृहात जे सांगितले जात आहे की, आरोप गंभीर आहेत म्हणून त्यांना शासन करा तर तसे होणार नाही.

**मा.सभागृह नेता :**

मा.आयुक्त महोदय, ऑक्टोबर महिन्यांत, सुशिक्षित आणि बेरोजगार सोसायटयांना कामे देऊ नयेत म्हणून आपण आदेश दिलेले होते. ते आदेश आलेले असतांना देखिल त्यांनी १८ प्रकरणे तुमच्याकडे पाठविली होती.

**मा.आयुक्त :**

मा.महापौर, मा.सभागृह, हा आरोप आहे. आरोप म्हणूनच त्यांच्या समोर जाईल. त्यांच्याकडून हयाबाबत खुलासा घेण्यांत येईल. एखादयावर खूनाचा किंवा चोरीचा आरोप आहे, हा आरोप सिरीयस आहे म्हणून कोर्ट त्यांची बाजू ऐकल्याशिवाय कधी शासन करेल का ? आरोप गंभीर असले तरी देखिल त्यांचे म्हणणे ऐकावे लागणारच ना ? काय झाले हे त्यांना विचारावे तर लागणारच.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, आज या ठिकाणी मला खेदाने नमुद करावे लागत आहे की, प्रशासन प्रमुख आज या पध्दतीने सभागृहामध्ये कथन करीत आहेत. म्हणजे त्यांच्या सबॉर्डिनेट अधिकाऱ्यांनी, संबंधित उपआयुक्त, कार्यकारी अभियंता, बीटमार्शल हयांनी दिलेले अहवाल आणि शासनाचे निदर्शनास आणून देण्यांत आलेले परिपत्रक हे सर्व चुकीचे आहे. आणि त्या उपआयुक्तांनाया ठिकाणी खुलाशाकरिता संधी दयायची ? या ठिकाणी आयुक्त सो., यांनी सांगितले की, मला फोन येतात, कोणाचे फोन येतात ? मग आता पण त्यांना फोन आला होता का ही कारवाई थांबवायला ?

**मा.आयुक्त :**

पूर्वीचे पण फोन ऐकले नाहीत आणि हा फोन आला तरी ऐकणार नाही.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मी कुठे म्हटले तुम्ही ऐकले की नाही ऐकले, साहेब तुम्हीच तर म्हणालात की फोन येतात म्हणून . मा.महापौर महोदय, सभागृहाला कळू दया की फोन कोणाचे आले ते आम्हाला माहिती पाहिजे.

**मा.आयुक्त :**

मा.महापौर, मा.सभागृह एखादया प्रभाग समितीच्या हद्दीमध्ये अनधिकृत बांधकाम होत असेल आणि त्या ठिकाणी तळ अधिक वन ते दोन मजल्यांचे बांधकाम होत असेल किंवा एखादया ठिकाणी २५-२५ घरे होत असतील तर ते एका सहाय्यक आयुक्तांच्यामुळे होत नाही. हया ठिकाणी आपण जे मुद्दे मांडले आहेत ते अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत आणि त्याबाबत साधकबाधक विचारणा करावीच लागेल. कारण त्यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा मलिन होत आहे.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, आता या ठिकाणी मा.आयुक्तांनी कथन केलेले आहे की झालेली बांधकामे ही एका सहाय्यक आयुक्तांचे निष्काळजीपणामुळे झालेली नाहीत. याठिकाणी मा.महापौर महोदय, पॉवर डेलिगेशन संदर्भात तत्कालिन आयुक्त आणि आताचे अतिरिक्त आयुक्त हयांनी सर्क्युलर काढले आहे की प्रत्येक प्रकरणी जबाबदार कोण आहे. मा.आयुक्तांचे कथनानुसार झालेली बांधकामे ही फक्त सहाय्यक आयुक्त हयांच्या एकटयामुळे झालेली नाहीत तर संबंधित परिमंडळ उपआयुक्त, उपआयुक्त(अतिक्रमण मुख्यालय), आणि सर्व संबंधित स्टाफने केलेली आहेत. हया सर्वांना तात्काळ निलंबित करण्याचे धारिष्टय आयुक्तांनी दाखवावे. नाही तर माझा स्पष्ट आरोप आहे, की आयुक्त त्यांना पाठबळ देत आहेत. कारण आयुक्तांची सद्यःस्थितीत भूमिका हा वादातीत आहे. मागच्या वेळी देखिल **फोजेसाठी** डेमोला परवानगी दिली गेली. मा.आयुक्त आणि श्री.लाला साहेब हयांनी संमती दिली. एक टॉवरच्या जागी चार चार टॉवर उभे केले गेले. मा.महापौर महोदय, मागील वेळेला देखिल मा.आयुक्तांनी सभागृहात सांगितले की, अनधिकृत बांधकाम असेल तर मी एमआरटीपी दाखल करेन. आतापर्यंत रिलायन्सवर किती एमआरटीपी दाखल करण्यांत आले आहेत ? नाही केले. म्हणजे सभागृहाची दिशाभूल. त्यानंतर आम्ही काही मुद्दे दिले आहेत परंतू त्यावर अजून कोणतीही कारवाई करण्यांत आलेली नाही. मा.आयुक्तांचे एक स्टेटमेंट होते, की तत्कालिन आयुक्तांनी केलेल्या कामकाजामध्ये मी नव्याने कोणतेही बदल करणार नाही. त्या निर्णयावर मी ठाम राहीन. मा.तत्कालिन आयुक्त श्री.राजीव सो., यांनी कॅफो आणि ऑडिटरचा अहवाल घेऊन समाज विकास विभागामार्फत ६७ लाख रुपये जास्त वाटले. बायोमेट्रीकमध्ये दिलेले ते देखिल आयुक्त महोदयांनी घेतले नाही. त्याच्यावर देखिल त्यांनी नव्याने मिटींग लावल्या. अजूनपर्यंत ती देखिल कार्यवाही प्रलंबित आहे. आताचे एक लेटेस्ट उदाहरण देतो.

**मा.आयुक्त :**

सर्व माहिती असतांना देखिल ॲलिगेशन होणार असेल तर मी जातो? ही काय पध्दत आहे का ? विषय काय आहे, बायोमॅट्रीकच्या बद्दल.. ..

**श्री.संजय घाडीगांवकर:**

एक मिनिट .. .. , मी विषय बदलत नाही आहे. माझे स्पष्ट मत मी मांडले आहे. सभागृहात मत मांडायला मी उभा राहिलो आहे. मला जे अनुभव आलेले आहेत, त्याबाबत मी बोलतो आहे. मा.आयुक्तांना मी एक पत्र दिले की, कंत्राटी कामगारांना २००६ पासून बोनस व वेतन दिले जात नाही. यामध्ये रजा व सुविधा याचे पेमेंट असते त्यामध्ये साडेपाच कोटी गेलेले आहेत. त्यांची देखिल चौकशी करण्यांत यावी. आणि हयाच्यात हयांचा हात आहे याबाबत पुरावे दिलेले आहेत. त्यांनी काय करावे त्यांची देखिल चौकशी करायची आहे त्यांनाच पत्र पाठवून दिले की याबाबत चौकशी करुन अहवाल पाठवून दया. म्हणजे ज्याच्याबद्दल चौकशी करायची आहे त्यांनाच पत्र पाठवून दयायचे ? आणि आता आयुक्त महोदय, एवढी चर्चा झाल्यानंतर सांगत आहेत की मी अजूनही त्यांना मुदत देतो. नोटीस पण त्यांना इश्यू केलेली आहे परंतू अजूनही कारवाई झालेली नाही. मा.महापौर महोदय, एवढी उदाहरणे आहेत, आणि या पध्दतीने कामकाज चालले आहे. म्हणजे प्रशासन काय कामकाज करते आहे ? आयुक्तांच्या भुमिकेबाबत आम्हाला संशय का येणार नाही ? ही जी उदाहरणे दिली ती संशय आल्यामुळे दिलेली आहेत. मी विषय दुसरीकडे कुठेही फिरवत नाही. त्या सहाय्यक आयुक्तांवर कारवाई व्हावी. जर त्यांची चूक नसेल तर ज्यांची चुक आहे त्यांच्यावर कारवाई करायची होती. पण काहीच कारवाई न करता तुम्ही आम्हाला शांत बसायला सांगत असाल, माझा वैयक्तिक अनुभव आहे मी स्वतः किती प्रकरणे दिली आहेत ?

**श्री.विक्रांत चव्हाण :**

मा.महापौर महोदय, सभागृहाचे काही संकेत आणि अधिकार आहेत. काल पासून सभागृहात एका विषयावर चर्चा होते आणि त्या विषयावर निर्णय होत नाही. आजही जवळजवळ दुपारपर्यंत या विषयावरती निर्णय झालेला नाही. आयुक्त महोदय, आपण काल नव्हतात म्हणून हा निर्णय झाला नाही, अतिरिक्त आयुक्त निर्णय घेऊ शकले नाहीत. वास्तविक जोपर्यंत दोष सिध्द होत नाही तोपर्यंत प्रत्येकजण निर्दोषच असतो. परंतू निलंबन हे शास्ती नव्हे. निलंबन करणे न करणे जेवढे महत्वाचे आहे तेवढेच या विषयातील गांभीर्य आणि या विषयाला होत असलेला उशिर, एखादया व्यक्तीला निलंबित करणे महत्वाचे नाही, परंतू एखादया प्रकरणात हलगर्जीपणाने

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, यापूर्वी ठाणे महानगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी ही एका रथाची दोन चाके बनून एकत्रितरित्या अत्यंत चांगल्या प्रकारे कार्यभार सांभाळत होते. आता या ठिकाणी नगरसेवकांनी एका अधिकाऱ्याच्या चुका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत आणि त्यावर निलंबनाची मागणी केली आहे. ठाणे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे आणि तो विषय या सभागृहात नगरसेवकांनी चर्चेला घेतला आहे. आणि म्हणून आम्ही कारवाई करु शकत नाही अशा प्रकारचा हट्ट प्रशासनाचा दिसून येत आहे. मा.महापौर महोदय, आम्ही कधीही आपल्या बरोबर सहकार्याने काम करायला तयार आहोत. ज्या वेळेला आमच्या सूचनांमध्ये प्रशासनाला काहीतरी चुकीचे आहे असे वाटते तेव्हा आयुक्तांकडून आम्हाला बोलावून त्याबाबत माहिती दिली जाते आणि त्याप्रमाणे आम्ही त्यावेळी आपल्याला पूर्ण सहकार्य करीत असतो.

**मा.सभागृह नेता :**

मा.महापौर महोदय, ज्या अधिकाऱ्यांविषयी एवढी चर्चा चालू आहे त्या अधिकाऱ्यांच्या अनधिकृत बांधकामांविषयी चर्चा तर सोडाच पण त्या प्रभाग समितीमध्ये कामाची पध्दत, मा.महापौर महोदय, मा.आयुक्त सो., तुम्ही अतिरिक्त आयुक्तांना सांगू नका, तुम्ही तिथल्या स्टाफशी चर्चा करा, माजीवडा मधील स्टाफशी करा किंवा कोपरीच्या स्टाफशी करा. तुम्हाला त्यांचे अनुभव ऐकायला मिळतील. त्याचबरोबर कोपरी प्रभाग समितीमध्ये तुम्हाला देखिल मी फोन केला, अतिरिक्त आयुक्त आणि समाज कल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांना फोन केला की समाजकल्याण खात्याच्या ज्या काही योजना होत्या त्याची फाईल ७ जुलै रोजी त्यांच्यासमोर ठेवण्यांत आली आहे परंतू अजूनही त्यांनी त्याच्यावर सही केली नाही. त्यांना दहा वेळेला सांगितले. परंतू कामाची यांची पध्दतच चुकीची आहे.

**श्री.नजीब मुल्ला :**

मजूर कामगार सहकारी संस्था, व सुशिक्षीत बेरोजगारच्या फाईल आहेत आपल्या आदेशानंतर देखिल त्यांनी १७ फाईल मजूर कामगार व सुशिक्षीत बेरोजगार वर मंजूर केल्या आहेत.

**मा.सभागृह नेता :**

नगरसेवकांशी बोलण्याची पध्दत त्यांना नाही हे काय चालले आहे ? लोकप्रतिनिधींपर्यंत नागरिक कामे घेऊन येतात आणि लोकप्रतिनिधी ती कामे अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवितात. जर नागरिक डायरेक्ट अधिकाऱ्यांपर्यंत जायला लागले तर अधिकाऱ्यांना ऑफिसमध्ये बसता येणार नाही. लोकप्रतिनिधी हे नागरिकांच्या अडचणी सांगत असतात. घरचे काम कोणीही सांगत नाही. परंतू अत्यंत चुकीच्या पध्दतीने त्यांना त्या अधिकाऱ्यांकडून ट्रिटमेंट मिळते. प्रभाग समितीच्या पहिल्या मिटींगला अधिकारी उपस्थित रहात नाहीत याचा अर्थ काय होतो ? अनेक चुकीच्या गोष्टी आम्ही बोलत नाही. परंतू ११.०० वाजता महानगरपालिकेची गाडी गोरेगांवला जाणार. त्यानंतर त्या दोन वाजता येणार आणि पुन्हा चार वाजता निघणार हे काय चालले आहे ? प्रभाग समितीच्या मिटींगचा अजेंडा सात दिवस अगोदर काढलेला असतांना या पहिल्या मिटींगला त्या उपस्थित राहू शकत नाहीत का ? किंवा उत्तर देण्याकरिता जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करु शकत नाहीत का ? मग त्या प्रभाग समितीला अर्थ काय ? मा.आयुक्त सो., लोकप्रतिनिधींना अत्यंत वाईट वागणूक मिळालेली आहे. आणि जे चुकीचे काम करीत असतील, अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत असतील त्यांची आणि इतरांची तुलना करु नका. मी या ठिकाणी सांगतो आहे की, सगळयांना एका मापात मोजू नका . आम्ही या ठिकाणी १५ वर्षांपासून आहोत. मी ठामपणे या ठिकाणी सांगतो की, एखादे अनधिकृत बांधकाम वाचविण्याकरिता कोणत्याही अधिकाऱ्याला फोन केलेला नाही. हे मी छातीठोकपणे सांगू शकतो. त्यामुळे अनधिकृत बांधकामाला संरक्षण देणाऱ्यांची आणि आमची या ठिकाणी तुलना करु नका असे मी ठामपणे सांगतो आहे. या महानगरपालिकेत काय चालले आहे ? जर आम्हाला इथे लोकप्रतिनिधी म्हणून किंमत मिळत नसेल तर या ठिकाणी रहाण्याची काय आवश्यकता आहे. एका फाईलवर सही मिळत नसेल, टॅक्स ट्रान्सफरच्या फाईलवर सही करण्याकरिता त्या क्लार्कला विचारले जाते की हयाच्यात काय आहे म्हणून. झोपडपट्टीमध्ये हा काय प्रकार आहे ? आज टॅक्स वसूल होत नाही म्हणून आपण ओरड करतो त्यावेळी टॅक्सची अनेक प्रकरणे इथे अशीच पडून आहेत. नगरसेवकांनी करायचे काय ? मा.महापौर महोदय, अनधिकृत बांधकामे झाली की वर्तमानपत्रातून नगरसेवक जबाबदार

**मा.आयुक्त :**

काढू त्या.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, आयुक्त सो., हयांनी आता या ठिकाणी आदेश पारीत केले टपऱ्या हटविण्याचे त्याच पध्दतीने निलंबनाचे आदेश देखिल पारीत करावेत दोन मिनिटात विषय संपवा. असे काही जर असेल की आम्ही काही मुद्दे मांडले आणि ते जर प्रशासन ऐकणार नसेल तर यापुढे आम्ही काही बोलणार नाही. मी तरी स्पष्टपणे सांगतो की मी स्वतः प्रशासनाच्या कोणत्याही कामाबाबत सभागृहात बोलणार नाही.

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, ठाणे शहराच्या महापौरांनी या ठिकाणी स्वतःची व्यथा सभागृहात मांडली आहे तिथे बाकीच्यांचे.काय ? हे सभागृह महापौर चालवितात त्यांचा मानसन्मान होत नाही बाकीच्यांचे काय ?

**श्री.मिलिंद पाटील :**

ज्या शहरातल्या महापौरांची ही परिस्थिती असेल तिथे काय उपयोग आहे ?

**श्री.संजय घाडीगांवकर :**

मा.महापौर महोदय, आम्हाला ब्लॅकमेलिंगचा प्रकार कधी जमला नाही आणि आम्ही केला नाही, आणि जर तो कोणी करीत असेल तर त्याला माझा विरोध आहे. प्रशासनाचे कोणी अधिकारी तुम्हाला किंवा आपल्या सदस्यांना ब्लॅकमेलिंग करीत असतील तर त्याला आमचा विरोध आहे.

**मा.महापौर :**

महापौरांना ब्लॅकमेल करण्याची कोणाची हिंमत नाही. महापौरांना कोण ब्लॅकमेल करतो ?

**मा.आयुक्त :**

सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह, ज्या शब्दावर आता सभागृहात चर्चा चालू आहे, तर मला वाटत नाही की मी तुम्ही मला ब्लॅकमेल करतो किंवा मी तुम्हाला ब्लॅकमेल करतो आहे. मला वाटते की सभागृहात या शब्दाचा वापर करण्यांत येऊ नये. माझी तशी विनंती आहे.

**श्री.नजीब मुल्ला :**

मा.महापौर महोदय, मला एक सांगा की, सभागृहाने या प्रकरणी तांतडीने कायदेशीर कारवाई करणेची अपेक्षा करणे चुकीचे आहे का ? आपल्या प्रशासनाने दिलेल्या रिपोर्ट नुसार आम्ही कायदेशीर कारवाई अपेक्षित करतो आहोत ते चुकीचे आहे का ?

**मा.आयुक्त :**

मा.महापौर महोदय, मा.सभागृह, या ठिकाणी प्रशासनाने आपली भूमिका सांगितली आहे. आपल्याला अधिकारान्वये आपण या प्रकरणी ठराव करावा. आणि आपला ठराव प्राप्त झाल्यानंतर त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आम्ही मा.महापौरांकडे देऊ.

**श्री.सुधीर बर्गे :**

मा.महापौर महोदय, या विषयावर कालपासून सभागृहात चर्चा होत आहे आणि त्यावर साधा आणि सोपा उपाय आयुक्तांकडे होते. एखादया अधिका-याला निलंबित करा असा सभागृहाचा कल असतांना त्यावेळी प्रशासनाकडून त्याला मान्यता मिळत नाही तेव्हा समोर मेसेज चुकीचा जातो. त्यामुळे माझी या ठिकाणी एक मागणी आहे, .. ..

**मा.आयुक्त :**

निलंबन छोटे नसते साहेब.

**श्री.सुधीर बर्गे :**

ज्या वेळेला एखादया प्रभाग कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी हे सर्व मिळून एखादया अधिका-याबाबत आक्षेप घेत आहेत अशा वेळेला त्या अधिका-याला काही काळ लांब ठेवणे ही काय चुकीची बाब आहे ?

**श्री.नजीब मुल्ला :**

मा. महापौर महोदय, आपले ठाणे महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री.मंगल शिंदे, श्री.मनिष जोशी हयांना तांतडीने जागेवर निलंबित करण्यांत आले. आपले श्री.हळदणकर हयांना देखिल तात्काळ निलंबित करण्यांत आले.

मा.सभागृहात चर्चेच्या अनुषंगाने आयत्यावेळी मांडण्यांत आलेला ठराव

**विषय :** सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे यांचेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ व ३९७ मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे बाबत.

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ९३(१) दिनांक २१.०८.२०१४**

**ठ रा व :**

सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे ठाणे महानगरपालिकेत मागील १ वर्षांपासून कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत त्या कोपरी प्रभाग समिती येथे सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. कोपरी प्रभाग समिती क्षेत्रातील समाज विकास विभागामर्फत नागरिकांना शासनाचे निर्णयाप्रमाणे वेगवेगळया योजनांचे अनुदान वाटपाचे काम निश्चित करुन दिलेले आहे. त्याबाबतीत सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे यांना मागील बऱ्याच दिवसांपासून वारंवार विनंती करुनही कार्यवाही केलेली नाही. सन्मा.सदस्यांपासून वारंवार विनंती करुनही कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत आहे. त्यांची कार्यपध्दती अतिशय संशयास्पद आहे. प्रभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांनाही त्या अत्यंत वाईट वागणूक देत आहेत. सन्मा.सदस्यांनी केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही केली जात नाही. प्रभाग समिती अध्यक्ष यांनाही ते सहकार्य करीत नाहीत. केवळ मनमानी पध्दतीने कामकाज करीत आहेत. त्यामुळे प्रभागातील कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

श्रीमती मृदुला अंडे हया यापूर्वी माजीवडा-मानपाडा प्रभाग समिती येथे कार्यरत होत्या. ( कालावधी दि.९.७.२०१३ ते ३०.६.२०१४) त्यावेळी त्यांचे कार्यकाळात अनेक अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. तसेच त्यांच्यावर अनेक प्रकारे गंभीर स्वरुपाचे आरोप झालेले आहेत. सन्मा.सदस्यांकडूनही अनेक लेखी तक्रारी प्रशासनाकडे सादर करण्यांत आलेल्या आहेत. अनेक नागरिकांनीही लेखी तक्रारी केलेल्या आहेत. त्यानुसार मा.स्थायी समितीमध्ये अनेक वेळा श्रीमती मृदुला अंडे यांचेवर कार्यवाही करणेबाबत सतवस्तर चर्चा झालेली आहे. त्यानुसार प्रशासनाकडून परिमंडळ उपआयुक्त यांना सर्व बाबतीत सविस्तर चौकशी करुन अहवाल देणेबाबत लेखी आदेश दिलेले आहेत. व त्यानुसार उपआयुक्त परिमंडळचे श्री. रणखांब यांनी सविस्तर चौकशी अहवाल मा.आयुक्त सो., यांचेकडे सादर केलेला आहे. सदरचा अहवाल आज सभागृहात लेखी स्वरुपात उपलब्ध करुन दिलेला आहे.

उपआयुक्त परिमंडळ यांचे अहवालाचे वाचन केले असता, अनेक गंभीर बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. त्याचाउहापोह सभागृहात करणे म्हणजे ठाणे महानगरपालिकेची जनमानसात प्रतिमा मलीन करणे सारखे आहे. त्यामुळे त्यावर भाष्य करणे उचित होणार नाही असे सभागृहाला वाटत आहे.

तत्कालिन सहाय्यक आयुक्त श्री.अशोक बुरपल्ले हयांनीही प्रभागात चालू असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबतचा प्रशासनाला लेखी अहवाल सादर केलेला आहे. त्याची प्रत सभागृहात उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. ती बाबही अत्यंत गंभीर आहे. अनेक अनधिकृत बांधकामे चालू असल्याचे स्पष्ट होत आहे व त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. प्रभागात चालू असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अनेक लेखी तक्रारी नागरिकांकडून व सन्मा.सदस्यांकडून सादर करुनही त्याची कोणतीही दखल सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे यांनी घेतली नाही. उलट अशा बांधकामांना संरक्षण देण्याचे काम केल्याचे उपआयुक्त परिमंडळ यांनी केलेल्या चौकशीवरुन सिध्द होत आहे. अनधिकृत बांधकामांना संरक्षण देणेही बाब अतिशय गंभीर आहे.

अशा प्रकारे मागील २ दिवसांपासून सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे यांचे कार्यपध्दतीबाबत सभागृहात अनेक सदस्यांनी आपली मते प्रदर्शित केलेली आहेत. व त्यांचेवर कठोर कार्यवाही करणेबाबत सुतोवाच केले आहे. मा.महापौर सो., यांनीही त्यांचे कार्यपध्दतीवर सभागृहात आपली नाराजी व्यक्त केलेली आहे.

सभागृहात मागील दोन दिवसांपासून अनेक सदस्यांनी सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे यांचे कार्यपध्दतीबाबत सभागृहात अनेक मुद्दे उपस्थित करुन कामात अनियमितता केल्याचे सभागृहाचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सभागृह सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१) सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे हयांनी माजीवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात कार्यरत असतांना अनेक अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिल्याचे सिध्द झाले आहे.तसेच अनेक वेळेला

लेखी स्वरुपात व समक्ष कळवूनही अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९७ अ (२) मधील तरतूदीनुसार त्यांचेवर प्रशासनामार्फत गुन्हा दाखल करण्यांत यावा व कायदेशीर कार्यवाही करावी.

२) सहाय्यक आयुक्त श्रीमती मृदुला अंडे हयांनी त्यांचे कार्यकाळात माजीवडा मानपाडा प्रभाग समिती व कोपरी प्रभाग समिती येथे कार्यरत असतांना अनेक कामात अनियमितता केली आहे. त्याबाबत परिमंडळ उपआयुक्त यांचेमार्फत चौकशी करण्यांत आलेली आहे व त्याबाबतचा अहवाल सभागृहात सादर झालेला आहे. त्यामध्ये अनेक गंभीर बाबी उघड झालेल्या आहेत. तसेच माजीवडा-मानपाडा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात अनेक अनधिकृत बांधकामे पूर्ण झालेली आहेत व त्या बांधकामांना श्रीमती मृदुला अंडे हयांनी संरक्षण दिल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे इतर अनेक अधिकाऱ्यांवर या पूर्वी करण्यांत आलेल्या कार्यवाही प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) व (२) चे (फ) मधील तरतूदीप्रमाणे निलंबनाची कार्यवाही करण्यांत यावी असे सक्षम प्राधिकारी म्हून ही मा.सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

वरील प्रमाणे कार्यवाही इतिवृत्तांताची वाट न पाहता, त्वरीत करावी असे ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते ठरवित आहे.

सूचक : श्री.नरेश म्हस्के                                    अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

**सर्वानुमते मंजूर.**

सही /- हरिश्चंद्र श्रीपत पाटील,
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**( तद्नंतर मा.महापौर सो., सभा तहकूब झाल्याचे जाहिर करतात.)**

हरिश्चंद्र श्रीपत पाटील
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**( सौ.छाया प्रकाश मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा संपल्याची वेळ : दुपारी ठिक २.१५ वा.
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक : २१.८.२०१४